या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

पाटोदा
# संचार
PATODA SANCHAR

E-mail-pat.sanchar@gmail.com संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे संपादक-विलास डोळसे




❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २० वे ❑ अंक १८२ वा ❑ शुक्रवार दि. २९ ऑगष्ट २०२५ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 20 th ❑ Issu -182 ❑ Friday 29 August 2025 ❑ Page- 4 Price- Rs.1.❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

## मराठा आणि ओबीसी समाजांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घेतली जाईल-मुख्यमंत्री

**मुंबई । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आवाहनानुसार मराठा आंदोलक हळूहळू मुंबईत पोहोचण्यास सुरुवात झाली आहे. रेल्वे आणि रस्ते मार्गानं आंदोलक आझाद मैदानाजवळ जमा होऊ लागले आहेत. गुरुवारी रात्री स्वतः मनोज जरांगे पाटील याठिकाणी पोहोचतील. शुक्रवारी सकाळपासून त्यांच्या बेमुदत आंदोलनाला सुरुवात होईल. तत्पूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर प्रतिक्रिया दिली असून, मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्याची मागणी समाजाच्या हिताची नाही, असं त्यांनी म्हटलं आहे. तसंच मराठा आणि ओबीसी या दोन्ही समाजांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घेतली जाईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

मुंबईकडे कूच करण्यापूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीसांवर कठोर टीका केली होती. देवेंद्र फडणवीस मराठा समाजाला आरक्षण देत नाहीत आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बोलण्याची संधीही देत नाहीत, असा आरोप त्यांनी केला. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी (२८ ऑगस्ट) माध्यमांशी संवाद साधताना आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, ओबीसीमध्ये सुमारे ३५० जाती आहेत. वैद्यकीय प्रवेशाच्या कटऑफवरून पाहिल्यास, ओबीसीचा कट ऑफ SEBC आणि EWS पेक्षा जास्त आहे. त्यामुळं सध्याच्या मागणीनं मराठा समाजाचे किती भले होईल, याचा विचार व्हायला हवा. आकडेवारी नीट तपासल्यास समाजाच्या हिताचं काय आहे, हे लक्षात येईल. तसंच मराठा समाजाच्या नेत्यांनी अभ्यासपूर्ण मागण्या मांडाव्यात. SEBC किंवा EWS मागणीमुळं राजकीय आरक्षण मिळणार नाही. सामाजिक-आर्थिक परिवर्तन हा उद्देश असेल, तर विचारवंतांनी यावर विचार करायला

पान दोन वर



## मराठा आरक्षण देणे सरकारची जबाबदारी, मग न्यायदेवतेची मध्यस्थी कशाला? जरांगेंचा सवाल

जुन्नर । प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी अंतरवाली सराटी येथून मुंबईच्या आझाद मैदानाकडे कूच करणाऱ्या मराठा मोर्चाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज किल्ले शिवनेरी येथे भेट देऊन आंदोलनाला सुरुवात केली. यावेळी त्यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत, 'मराठा आरक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे. यासाठी न्यायदेवतेची मध्यस्थी कशाला,' असा सवाल उपस्थित केला. शिवनेरीच्या मातीला कपाळी लावत त्यांनी आरक्षणासाठी बलिदानाची तयारी दर्शविली.

सकाळी जुन्नर येथे आगमन झालेल्या जरांगे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापाशी आंदोलकांसह जयघोष केला. ट्रक, टेम्पो, जीप आणि दुचाकींमधून मोठ्या संख्येने मराठा आंदोलक शिवनेरीच्या पायथ्यापासून शिवाई मंदिरापर्यंत पारंपरिक वाद्यांच्या गजरात सहभागी झाले. जरांगे यांनी शिवाई देवीची आरती करून



शिवजन्मस्थळी नतमस्तक होत, 'ही लढाई आता आरपार असेल,' असा निर्धार व्यक्त केला.

जरांगे म्हणाले, 'मराठा समाजाच्या लेकरांच्या वेदनांना न्याय देण्यासाठी हे आंदोलन आहे. गरीब मराठ्यांचा अपमान करू नका सत्ता मराठ्यांनी दिली; पण सरकार मराठ्यांवरच उलटले.' रायगड आणि शिवनेरीसारखी

पान दोन वर

## मुंबईकडे निघालेल्या केजच्या आंदोलकाचा हृदयविकाराने मृत्यु

केज । प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनासाठी मुंबईकडे निघालेल्या वरपगाव (ता. केज) येथील सतीश ज्ञानोबा देशमुख (वय ४५) यांचा पुणे जिल्ह्यातील नारायणगावजवळ हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यु झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

सतीश देशमुख हे मित्रासोबत मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत होणाऱ्या मराठा आरक्षण आंदोलनासाठी रवाना झाले होते. नारायणगाव परिसरात आल्यानंतर अचानक त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यात त्यांचा जागीच मृत्यु झाला.

देशमुख कुटुंबावर याआधीच दुःखाचा डोंगर कोसळला होता. तीन वर्षांपूर्वी त्यांचा एक मुलगा विजेचा



शॉक लागून मृत्युमुखी पडला होता. दुसरा मुलगा सध्या पदवीच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत आहे. सतीश देशमुख यांच्या निधनामुळे कुटुंबावर पुन्हा एकदा मोठा आघात झाला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी नंदुबाई, मुलगा आणि वृद्ध आई असा परिवार आहे.

या अकस्मात निधनामुळे गावात तसेच आंदोलनात सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली आहे.

**या मृत्यूंना फडणवीस जबाबदार - मनोज जरांगे**

सतीश देशमुख यांच्या निधनाने वृत्त कळताच मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मला आता माहिती कळाली की आमचा देशमुख नावाचा बांधव प्रवासात असताना त्यांचा दम छाटला आणि त्यांना अटॅक आला. मी याबाबत अजूनही माहिती घेत आहे. परंतु ही घटना अत्यंत दुःखद आहे. याला जबाबदार फडणवीस साहेब आहेत. तुम्ही आता जर का आम्हाला आरक्षण दिले तर आमचे बळी जाणार नाहीत. आमचे आणखी दोन बळी घेतले आहेत. लातूरला परवाच्या दिवशी अशीच घटना घडली आहे. आज देखील अशीच घटना घडली आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

## मनोज जरांगेंची हाक अन् आझाद मैदानावर लाखो आंदोलकांची कूच, गर्दी जमण्यास सुरुवात

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी मराठा समाजाचे नेते जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाची हाक दिली आहे. त्यामुळे राज्यातील संपूर्ण मराठा समाज त्यांच्या पाठीशी उभा राहिला आहे.

मनोज जरांगे यांना आझाद मैदानात एक दिवसासाठी आंदोलनाची परवानगी मिळाली असली तरी त्यांना पाठिंबा देण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यामधून तुकड्या तुकड्यांमध्ये मराठा बंधू-भगिनी हजारोंच्या संख्येने मुंबईकडे ट्रेन, चारचाकी, दुचाकी वाहने, ट्रॅक, टेम्पो



आदी वाहनांमधून दाखल होण्यास सुरुवात झाली आहे.

त्यामुळे आझाद मैदान परिसरात गर्दी वाढू लागली आहे. डोक्यावर भगवी टोपी, गळ्यात भगवी मफलर, हातात भगवा झेंडा, बॅनर, फलक घेऊन मराठे लोक 'एक मराठा, लाख मराठा', 'कोण म्हणतो देणार नाही, अरे घेतल्याशिवाय राहणार नाही', अशा घोषणांनी सीएसएमटी रेल्वे स्थानक, आझाद मैदान परिसर दणाणून गेले आहे.

दरम्यान, मराठा आरक्षणासाठी उपोषणाची जय्यत तयारी मराठा समाजाकडून आझाद मैदानात युद्धपातळीवर सुरू असून दुपारपासून

पान दोन वर

## चतुरवाडीत बालविवाह उघड, सहा जणांवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील चतुरवाडी येथे तीन वर्षांपूर्वी एका अल्पवयीन मुलीचा विवाह झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी ग्रामविकास अधिकारी बंडु जांभळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून सहा जणांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

बंडू जांभळे हे ग्रामपंचायत जोगाईवाडी येथे नेमणुकीस असून चतुरवाडीचे कामकाजही तेच पाहतात. त्यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, चतुरवाडी येथील १७ वर्षीय अल्पवयीन हिचा विवाह दिनांक २८ मार्च २०२२ रोजी आमोल मोतीराम मदने (रा. फरदपूर, ता. रेणापूर, जि. लातूर) याच्यासोबत लावण्यात आला. विवाहावेळी मुलगी अल्पवयीन असूनही बालविवाह झाल्याचे तपासात स्पष्ट झाले.

तक्रारीनंतर ग्रामपंचायत कर्मचारी अन्सर हमीद पठाण, आशा कार्यकर्ती छाया खांडेकर, अंगणवाडी मदतनीस सुमन पवार व लिपिक अविनाश वाकडे यांनी चौकशीदरम्यान दिलेल्या माहितीतूनही हा विवाह झाल्याची खात्री पटली. यावेळी पिडीत मुलीचे आई-वडील, मुलाचे वडील मोतीराम मदने, आई संजीवनी मदने हे सर्व विवाहास उपस्थित होते. हा विवाह संजय बाबुराव गोडबोले (रा. जोगाईवाडी) यांच्या हस्ते लावण्यात आला होता.

अल्पवयीन मुलगी असल्याचे माहिती असतानाही विवाह लावून देण्यात आल्याने पती आमोल मदने, मुलीचे आई-वडील, मुलाचे आई-वडील मोतीराम व संजीवनी मदने तसेच विवाह लावणारे संजय गोडबोले अशा सहा जणांविरुद्ध अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गंभीर प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार महेश भागवत करत असून पुढील कारवाई सुरू आहे.

दरम्यान, पोलीसांनी बालविवाह हा कायद्याने गुन्हा असल्याचे सांगत नागरिकांनी अशा घटना रोखण्यासाठी तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन केले आहे.

## मराठा समन्वयकांना पोलिसांनी बजावल्या नोटीसा; आंदोलनाची धार कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न?

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी इथून मुंबईकडे निघालेले मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे आज रात्री उशिरा मुंबईत पोहोचणार असून उद्या सकाळी ते आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणास सुरुवात करणार आहेत.

आरक्षण प्रश्नावरून मनोज जरांगे हे सरकारविरोधात आक्रमक झाले असून लाखो समर्थकांसह ते मुंबईत येत असल्याने सरकारची कोंडी होणार आहे.

जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी आणि त्यांच्या आंदोलनाची धार कमी करण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. अशातच आता सोलापूरमधील मराठा समन्वयकांना पोलिसांनी नोटीसा बजावल्या आहेत. ज्या नोटीसा मनोज जरांगेंना बजावल्या होत्या, त्याच नोटीसा सोलापूरमधील मराठा समन्वयकांना बजावल्या आहेत.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ सोलापुर जिल्ह्यातून हजारो मराठा बांधव मुंबईकडे रवाना झाले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातून मुंबईकडे जाणाऱ्या अडीचशेहुन अधिक मराठा समन्वयकांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. तालुक्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यातून नोटीसा बजावण्यात आल्या असून पोलिसांकडून ४० सूचना देण्यात आल्या आहेत.

## राज्यात मुसळधार पावसाचा इशारा!

### महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यांना यलो, काहींना ऑरेंज अलर्ट

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रावर पुन्हा एकदा पावसाचे संकट घोंगावत आहे. भारतीय हवामान विभागाने राज्यातील अनेक भागांत वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. राज्यातील २८ जिल्ह्यांना यलो अलर्ट, तर काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**कोकण आणि मुंबई परिसर**

मुंबई: शहरात मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता.

पालघर, ठाणे: विजांसह पावसाचा इशारा; यलो अलर्ट.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग: मुसळधार पावसाची शक्यता; यलो अलर्ट.

**पश्चिम महाराष्ट्र व घाटमाथा-** पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर: हलका ते मध्यम पाऊस.

घाटमाथा (पुणे, कोल्हापूर, सातारा): अतिवृष्टीची शक्यता; ऑरेंज अलर्ट.

**मराठवाडा-** छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड: वादळी वारे व विजांच्या कडकडाटासह पाऊस; यलो अलर्ट.लातूर, धाराशिव: हलका ते मध्यम पाऊस.

**उत्तर महाराष्ट्र-** धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर: विजांसह पावसाचा अंदाज; यलो अलर्ट. नाशिक घाटमाथा: मुसळधार पाऊस होण्याची शक्यता.

**विदर्भ-** अकोला, अमरावती: वादळी वारे आणि विजांसह मुसळधार पावसाचा इशारा.

भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ: विजांसह वादळी वाऱ्याचा अंदाज; यलो अलर्ट.

## पूरसंकटावर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज-नागरिकांनी सावधगिरी बाळगणे गरजेचे-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

गुरुवारी ( २८ ऑगस्ट ) संपूर्ण बीड जिल्हाभर पावसाची रिपरिप सुरु होती. पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाचा आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग तसेच बीड जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. भारतीय हवामान विभागाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या इशाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश देण्यात आले आहेत. पूरप्रवण भागातील नागरिकांनी प्रशासनाशी पूर्ण सहकार्य करावे. नदी, नाले, धरण, तलाव या ठिकाणी जाणे टाळावे. सुरक्षित स्थळी हलण्यास प्रशासनाने सांगितल्यास त्वरित पाऊल उचला, असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले आहे.

अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नागरिकांना सूचना देताना अधिकृत सूचनांचे पालन करा, अफवांवर विश्वास ठेवू नका. महत्त्वाची कागदपत्रे, औषधे, अन्नसाठा आणि पिण्याचे पाणी सुरक्षित ठेवा, असे सांगितले. तर अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे-सोनवणे यांनी पूराच्या पाण्यातून पायी किंवा वाहनाने जाणे जीवघेणे ठरू शकते. मोबाईल चार्ज ठेवावा, सुरक्षित पाणीच वापरावे, असा इशारा दिला.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे यांनी नागरिकांना दिलासा देताना पूरस्थिती किंवा आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांनी घाबरून न जाता तातडीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा . प्रशासन पूर्णपणे सज्ज असून त्वरित मदत पुरवली जाईल, असे सांगितले . त्यांचा संपर्क क्रमांक ९५६१४९९४४९ असून, याशिवाय आपत्कालीन क्रमांक १०७७ / १००० / ९९२ हे नेहमी खुले असतील . अधिकृत माहिती एस डी एम ए ऍट महाराष्ट्र या वेबसाईटच्या माध्यमातून मिळेल. पूर ओसरल्यानंतर घरात परतताना स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण आवश्यक आहे . दूषित पाणी व सडलेले अन्न टाळा, असे उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी कटाक्षाने नमूद केले.

जिल्ह्यात मागील २४ तासांत सरासरी २५ मिमी पावसाची नोंद झाली असून आतापर्यंत ४२१.७ मिमी पाऊस झाला आहे . हा वार्षिक सरासरीच्या तुलनेत ७५ टक्के इतका आहे. बीड जिल्ह्यातील माजलगाव, माजलगाव तलाव, सिंदफणा नदी परिसर, तसेच पाटोदा, आष्टी या भागांना पावसामुळे विशेष दक्षतेचे निर्देश दिले आहेत.

आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा : राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एसडीएमए) हे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख प्राधिकरण असून आपत्तीपूर्व तयारी, बचावकार्य, पुनर्वसन आणि पुनर्निर्माण या सर्व टप्प्यांवर नियोजन करते. बीड जिल्ह्यातील नियंत्रण कक्ष २४ तास सुरू आहे. यासाठी जलसंपदा विभाग, पोलीस, आरोग्य, महसूल, पाटबंधारे, ग्रामविकास, शिक्षण

पान दोन वर

## संगमनेरचे आमदार अमोल खाताळ यांच्यावर हल्ला

### सुरक्षारक्षकांनी हल्लेखोर तरुणाला घेतले ताब्यात

संगमनेर । प्रतिनिधी

संगमनेर येथील शिवसेनेचे आमदार अमोल खताळ हे संगमनेर फेस्टिवलच्या उद्घाटन कार्यक्रमास गेले होते. यावेळी संगमनेर तालुक्यातील खांडगाव येथील एका तरुणाने हात मिळवण्याच्या बहाण्याने त्यांच्यावर हल्ला केला.



मालपाणी उद्योग समूहाच्या सुरक्षारक्षकांनी हल्लेखोर तरुणाला ताब्यात घेतले आहे. रात्री आठच्या सुमारास ही घटना घडली.

अमोल खताळ यांच्यावरील हल्ल्याची बातमी संगमनेरमध्ये वाऱ्यासारखी पसरली. त्यानंतर खताळ समर्थक आक्रमक झाले. आमदार समर्थकांचा प्रचंड मोठा समूह संगमनेर पोलीस ठाण्याच्या परिसरात जमा झाला आहे. सध्या संगमनेर मध्ये तणावपूर्ण परिस्थिती आहे.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि हिंदुत्ववादी कीर्तनकार संग्राम बापू भंडारे यांच्यातील संघर्षामुळे संगमनेरची चर्चा राज्यात होत असताना गुरुवारी संगमनेरमध्ये ही घटना घडली

संचार

# राज,उद्धव आणि देवेंद्र

उद्धव ठाकरेंना निशाणा करत सुमारे दोन दशकांपूर्वी राज ठाकरेंनी शिवसेनेशी फारकत घेतली. तेव्हापासून गेल्या महिन्यात पाच जुलैला त्याच उद्धव ठाकरे यांच्या बरोबर हिंदी भाषा सक्तीची न करण्याच्या मुद्द्यावर विजयी मेळावा घेताना राज त्याच ठिकाणी परत आले जिथून त्यांनी फारकत घेतली होती. त्यांची सर्वात वादग्रस्त ठरलेली भूमिका होती जेव्हा २०१९ साली त्यांनी ‘लाव रे तो व्हिडिओ’ म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विरूद्ध प्रचाराची राळ उडवून दिली होती. वारंवार बदलत्या भूमिकेत राज पुन्हा त्याच जागी वापस आले होते ज्यांच्या नेतृत्वक्षमतेवर त्यांनी प्रश्न उपस्थित केले होते.

बाळासाहेब ठाकरे यांना मानणार्या एका मोठ्या वर्गाला या दोन नेत्यांनी हातमिळवणी करावी अशी अपेक्षा होती. कारण दोन्ही नेते शिवसेनाप्रमाणेच महाराष्ट्राच्या हिताविषयी, मराठी माणसाच्या प्रश्नांबद्दल बोलणारे आहेत. त्यांचा स्वभाव, राजकारणाची शैली वेगळी असली तरी एकत्र आल्यास शिवसेनेचे विखुरलेले मत पुन्हा एकत्र होण्याची शक्यता होती. ते अखेर घडलं होतं. आगामी महापालिका निवडणुकीत दोन भाऊ एकत्र येऊन ७५ हजार कोटी रुपयांचं बजेट असणार्या मुंबईच सुकाणू ठाकरे घराण्याच्या हातातच राहील अशी भाकिते केली जाऊ लागली. त्यासाठी उद्धव त्यांना मुख्यमंत्री पद देणार्या काँग्रेसलाही समजावून सांगण्यास तयार होते.


पण कुठेतरी माशी शिंकली. त्रिकोणातील वर बसलेला कोन जागा झाला आणि राज ठाकरे गेल्या आठवड्यात मुंबईतील कार पार्किंगच्या अतिशय महत्त्वाच्या (?) मुद्द्यावर आपली मते व्यक्त करण्यासाठी आपल्या लवाजम्यासह चक्क वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचले. हेही कमीच की काय म्हणून पाठोपाठ त्यांचे चिरंजीव अमित चक्क आशिष शेलार यांना भेटले. विषय होता सणासुदीच्या काळात परीक्षा न ठेवण्याचा. हे शेलार तेच ज्यांनी आता राज ठाकरेंच्या पाच जुलैच्या भाषणावर टीका केली होती. या दोन्ही भेटी केवळ पार्किंग आणि परीक्षा या विषयापुरत्याच मर्यादित असतील असं वाटत नाही. या दोन्ही भेटीत बरंच पाणी मुरलं आहे. या भेटीमुळे उद्धव-राज युतीची शक्यता कमी झाली आहे, तर भाजपने आपले राजकीय गणित अधिक मजबूत केले आहे. राज ठाकरेंनी आपली भूमिका धरसोड वृत्ती कायम ठेवली आहे.

काँग्रेस-राष्ट्रवादीसुद्धा उद्धव-राज युतीला मान्यता देतीलच याची खात्री नाही. त्यामुळे ही बैठक उद्धव ठाकरे यांच्यासाठी राजकीय दृष्टीने नक्कीच धोक्याची घंटा आहे.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे भाऊ असूनही दीर्घकाळ राजकारणात प्रतिस्पर्धी राहिले. उद्धव ठाकरेंना विरोध करत राज यांची मनसे सुरुवातीला मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर जोरदार उभी राहिली, पण काळानुसार पक्षाची ताकद कमी होत गेली.

राज आणि उद्धव एकत्र येतील, अशी चर्चा रंगत असतानाच फडणवीसांसोबत झालेली ही बैठक त्यांच्या समीकरणाला धक्का पोहोचवणारी आहे. उद्धव ठाकरे काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत आघाडी टिकवून आहेत. त्यांनी केंद्रातील भाजप सरकारवर सातत्याने टीका केली आहे. अशा वेळी त्यांचा भाऊ राज ठाकरे जर भाजपच्या जवळ गेले, तर उद्धव-राज युतीची शक्यता जवळपास संपुष्टात येईल. राज भाजपबरोबर गेल्यास त्यांचा मराठी अस्मितेचा चेहरा धूसर होईल.अशा पार्श्वभूमीवर राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची झालेली गुप्त किंवा ‘क्लोज डोअर’ बैठक अनेक प्रश्न निर्माण करते.

भाजपला मनसेची साथ हवी आहे का? किंवा उद्धव-राज युती होऊ नये यासाठी भाजप राज ठाकरे यांच्याशी आधीच गाठीभेट घेत आहे का? भाजपला पुढील लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लक्षात घेता आणखी काही मराठीवादी मतांची गरज आहे. मनसेकडे मतांचे फार मोठे बँक नाही, पण ठराविक भागात मनसेचा प्रभाव आहे. त्याशिवाय, राज ठाकरे यांची भाषणशैली आणि जनतेशी संवाद साधण्याची क्षमता भाजपसाठी उपयुक्त ठरू शकते. याच कारणामुळे भाजप राज ठाकरे यांना आपल्या जवळ ठेवू पाहत आहे, असे मानले जाते.

# माटुंगा येथील जीएसबीचा गणपती भारतातील सर्वात श्रीमंत गणपती




गणेश ही पौराणिक हिंदू धर्मातील प्रथम पूज्य व त्या एक मुख्य देवता आहे.विघ्नहर्ता, बुद्धीची देवता आणि सर्व देवांमध्ये गणपती बाप्पा हा प्रथम पूजनीय मानतो. गणेशोत्सव म्हणजे भक्तिभाव, श्रद्धा आणि आनंदाचा उत्सव ! सोबतच मांगल्य, उत्साह आणि जल्लोष यांचा संगम! श्रीगणेश उपासना करणारे लाखो भक्त भारतात आहेत. श्रीगणेश ही तर महाराष्ट्राची लाडकी देवता आहे. ऐहिक किंवा आध्यात्मिक सुखाच्या अपेक्षेने हे भक्त अनेक प्रकारे या देवतेची उपासना करतात. कोणत्याही मंगल कार्याला आरंभ करताना मंगलमूर्ती श्रीगजाननाचे मंगलमय स्मरण करणे ही सज्जनांची परंपरागत पध्दती आहे. कारण तो विघ्नहर्ता आहे. तो विघ्नराजही आहे. तो आपल्या सामर्थ्याने विघ्नांना प्रेरणाही देऊ शकतो व विघ्नांचे दमन आणि शमनही करू शकतो.

भव्य- दिव्य गणेशमूर्ती आणि अनोखी सजावट हे मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सवाचे मुख्य आकर्षणाचे केंद्रबिंदु आहे. मुंबईतील अशी अनेक प्रसिद्ध गणेश मंडळे आहेत, जे कित्येक वर्षांपासून गणेशोत्सवाची परंपरा आनंदाने साजरी करत आहेत. मुंबईत सार्वजनिक गणपती आता मंडपात सज्ज झालेले पाहायला मिळत आहे. गणपती म्हटलं की, सर्वत्र आपल्याला धामधूम आणि भक्तांची गर्दी पाहायला मिळते. मुंबईतील आकर्षणाचा केंद्रबिंदू आणि भारतातील सर्वात श्रीमंत गणपतीची मूर्ती म्हणून मुंबईतील माटुंगा येथीलजीएसबीचा गणपती ओळखला जातो. कर्नाटकातून आलेल्या गौड सारस्वत ब्राह्मण समुदायाने

१९५५ साली जी. एस. बी समाजातील माधव पुराणिक यांनी या गणेशोत्सवास सुरूवात केली. त्याकाळी लहान स्वरूपात सुरू झालेली ही गणेशपूजा आज भव्य दिव्य झाली आहे.आजही मुंबईत जी.एस.बी समाजातील व्यक्ती एकत्र येऊन गणेशपूजा करतात.जी.एस. बी मंडळ हे सार्वजनिक गणेशमंडळ असले तरीही या गणेशमूर्तीची स्थापना केवळ ५ दिवसांसाठी किंग सर्कल येथील जी.एस. बी स्पोर्ट्स क्लब ग्राऊंडवर केली जाते.जी. एस. बी गणपतीसाठी खास दिखाव्याची किंवा थीमची रोषणाई केली जात नाही. हे मंडळ केवळ धार्मिक परंपरेनुसार नियमित पूजा करते.गेली कित्येक वर्षे हे मंडळ आपली परंपरा कायम राखून आहे. जीएसबी गणपतीची मूर्ती ही पर्यावरणपूरक असून ही मूर्ती चिकणमाती, गवत आणि नैसर्गिकरित्या पाण्याच्या रंगानी बनवण्यात येते.मात्र मूर्तीला शुद्ध सोन्याची आभूषणे घातली जातात. गणपतीचे अनेक अवयवही सोने-चांदीच्या दागिन्यांनी बनवलेले आहेत. त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या दागिन्यांनी मढवलेला हा गणपती असतो. गणेशोत्सवाच्या या पाच दिवसात विविध होम, पूजा अर्चना चालते. जीएसबी गणेश मंडळाची मुर्ती ही दरवर्षीप्रमाणे यंदा सुद्धा पहिल्याच दिवशी सोनं, चांदी अर्पण करण्यात येते. त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या दागिन्यांनी मढवलेला हा गणपती असतो.

यावर्षी गणेशोत्सवाचे ७१ वे वर्ष आहे, जे २७ ते ३१ ऑगस्ट दरम्यान नेहमीच्या ठिकाणी म्हणजेच श्री सुक्रतेंद्र नगर, किंग्ज सर्कल येथे बाप्पा विराजमान झाले आहेत. शहरातील हे एकमेव गणेश मंडळ आहे जेथे चोवीस तास विधी केले जातात. पाच दिवस दर्शनासाठी मोठा जनसमुदाय येतो, त्यांच्या सुरक्षेसाठी मंडळामध्ये हाय डेन्सिटी कॅमेरे बसवण्यात आले आहेत. दररोज ५० हजार भाविकांसाठी भोजन व प्रसादाची व्यवस्था आहे. येथे भाविकांकडून महागणपतीला सरासरी ६० हजार पूजा व सेवा अर्पण केल्या जाणार आहेत असे मंडळाचे अध्यक्ष अमित पै यांनी सांगितले

महागणपतीची मूर्ती ६६ किलोहून अधिक सोन्याचे दागिने आणि ३३६ किलो चांदी व इतर मौल्यवान साहित्याने सजवण्यात आली आहे. त्यामुळेच दागिने आणि गणेशभक्तांच्या सुरक्षेसाठी मंडळाने ४७४.६४ कोटी रुपयांचा विमा करून घेतला आहे. या विम्याच्या रकमेत सोने, चांदी आणि इतर दागिन्यांचा समावेश आहे. याशिवाय मंडळात दर्शनासाठी येणारे भाविक, स्वयंसेवक, पुजारी, स्वयंपाकी, स्टॉल कर्मचारी, सुरक्षा रक्षक आदींचाविमा समाविष्ट आहे.गणेशभक्तांनी अर्पण केलेल्या दागिन्यांनी गणेशमूर्ती सजवली जाते आणि पाच दिवस अखंडपणे येथे धार्मिक विधी केले जातात. त्यामुळे गणेशभक्त मोठ्या संख्येने येतात. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून गणेश मंडळे दरवर्षी दागिने आणि सेवेत गुंतलेल्या लोकांच्या सुरक्षिततेसाठी विमा उतरवतात असे जी आर भट यांनी सांगितले

वाराणसी येथील धर्मपीठ श्री काशी मठ संस्थानशी जी. एस. बी. सेवा मंडळाची निष्ठा आहे आणि प्रत्येक मुंबईकराच्या हृदयाच्या अगदी जवळ आहे. गणेश चतुर्थीच्या भव्य उत्सवामुळे मंडळाला जागतिक स्तरावर प्रशंसा प्राप्त झाली आहे. सामाजिक कार्ये आणि धर्मादाय उपक्रमांमधील वाढ हे धर्मगुरू, परमपूज्य श्रीमद् सुधींद्र तीर्थ स्वामीजी आणि आपले सध्याचे मठाधीपती श्रीमद् संयमींद्र तीर्थ स्वामीजी यांच्या आशीर्वाद आणि अविरत मार्गदर्शनामुळे होत असते.

सामाजिक आणि धर्मादाय कार्यात आघाडीवर असलेल्या या संस्थेची स्थापना १९५१ मध्ये एक ना नफा ना तोटा या तत्वावर झाली. आणि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा, १९५० अंतर्गत नोंदणीकृत झाली. जी. एस. बी. सेवा मंडळ सातत्याने गरजू आणि वंचितांपर्यंत पोहोचण्यासाठी सतत प्रयत्नशील असते. गेल्या काही वर्षांपासून सर्व उपक्रमांसाठी सर्व कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक तत्वज्ञान 'सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे संतु निरामयः' आहे. संस्थेच्या वतीने मीरा - भाईंदर येथे १०० खाटांचे बहु-उद्देशीय धर्मादाय रुग्णालय बांधण्याचा प्रयत्न करतो आहे. सर्वांना परवडणाऱ्या किमतीत जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा प्रदान करणे हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. हा प्रकल्प एका प्रामाणिक मिशन स्वरूपात हाती घेतला गेला आहे आणि अपेक्षित वेळेपूर्वी तो पूर्ण करण्यासाठी पदाधिकारी कठोर परिश्रम करत आहोत. बांधकामाला जोमाने सुरुवात झाली आहे त्यामुळे सर्व भाविकांनी पुढे येऊन या प्रकल्पासाठी उदार हस्ते देणगी देण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच मुंबई आणि ठाण्याच्या मध्यभागी असलेल्या विविध रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांसाठी संतुष्ट अन्न दान सेवा दररोज राबविण्यात येते. यापूर्वी गरिबांसाठी मुंबई, ठाणे आणि डोंबिवलीमध्ये मोफत लसीकरण शिबिरे, कोकणातील पुराच्या वेळी, खेड, चिपळूण तसेच केरळमधील पूरग्रस्त भागात पाणी, अन्न, कपडे इत्यादी पुरवण्यासाठी पुढाकार घेतला. शिक्षण आणि वैद्यकीय मदत, सामूहिक उपनयन, ज्ञान शिबिर, तरुणांना करिअर मार्गदर्शन आणि इतर अनेक सामाजिक उपक्रम देखील राबविण्यात येतात. अनेक दृष्टिहीन व्यक्तींसोबत जवळून काम करत आहोत आणि त्यांना सन्माननीय जीवन जगण्यास मदत करण्यासाठी मदत केली जाते. आमच्या धर्मगुरूंच्या आशीर्वादाशिवाय आणि तुमच्या उदार योगदानाशिवाय हे सर्व शक्य झाले नसते अशी गौड सारस्वत ब्राम्हण समाजातील सर्वच व्यक्तींची भावना आहे.

या गणपती बाप्पाचे दिवस-रात्र राबणारे कार्यकर्ते हे उद्योजक आणि पदवीधर असतात त्याचप्रमाणे निरक्षर लोकही निरपेक्ष भावनेने सर्व कार्यात मनोभावे समरस होत असतात. स्त्री-पुरुष, लहान-थोर, गरीब श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी, भारतातीलच नव्हे, तर परदेशातीलसुद्धा असे अनेक प्रकारचे भक्त मनोभावे नवसाला पावणाऱ्या या बाप्पाच्या दर्शनासाठी येत असतात. श्रीगणेशाची पूजा आणि साधनेच्या पलीकडे जाऊन प्रत्येक भक्ताशी आपुलकीचे नाते जोडणारा जी. एस. बी. सेवा मंडळाचा हा श्रीगणराया बुद्धी आणि शौर्याचे प्रतीक आहे.

या मंडळाचे मुख्य संयोजक डॉ भुजंग पै आहेत तर सहसंयोजक म्हणून श्री. जि दामोदर राव, गणेश प्रभू, डॉ दीपक शेणॉय, डॉ अजित कामत, ऍड रामचंद्र किणी, श्रीमती विजया कामत, श्रीनिवास कामत हे आहेत तर मंडळाचे विद्यमान अध्यक्ष श्री अमित पै, सेक्रेटरी विष्णू कामत, उपाध्यक्ष कृष्णा कामत, सहसेक्रेटरी शिवानंद भट, खजिनदार विठ्ठलदास भट आहेत.

**- रवींद्र मालुसरे**
अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई
९३२३११७७०४

# संमतीने शरिरसंबंध ठेवल्यानंतर लग्नाला नकार देणे हा बलात्काराचा गुन्हा नाही; सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

सुरत । वृत्तसेवा

संमतीने शरिरसंबंध ठेवल्यानंतर लग्नाला नकार देणे याला बलात्कार म्हणता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय गुजरातमधील सुरत सत्र न्यायालयाने दिला आहे. याच आधारे न्यायालयाने तीन वर्षांपूर्वीच्या बलात्कार प्रकरणात आरोपी तरुणाची निर्दोष मुक्तता करीत त्याची सुटका करण्याचे आदेश दिले आहेत.

तीन वर्षे संमतीने लैंगिक संबंध ठेवल्यानंतर लग्न करण्यास नकार देणे हा बलात्कार नाही, असा युक्तीवाद बचाव पक्षाच्या वकिलांनी केला होता. तो युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने हा निर्णय दिला.

जुलै २०२२ मधील बलात्कार प्रकरणातील आरोपीला सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. सुरतमधील दिंडोली येथील एका बीबीए मुलीने कतारगाम येथील एमटेक शिकणाऱ्या तरुणाविरुद्ध तक्रार केली होती. तरुणाने तिच्याशी इंस्टाग्रामच्या माध्यमातून मैत्री केली आणि लग्नाचे आमिष दाखवून अनेकदा शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर लग्न करण्यास नकार दिला, असा आरोप मुलीने पोलिस तक्रारीत केला होता. तथापि, तिच्या या आरोपाचे आरोपीतर्फे बचाव पक्षाचे वकील अश्विन जोगडिया यांनी खंडन केले.

आरोपीचे तक्रारदार मुलीशी कोणत्याही प्रकारचे जबरदस्तीचे संबंध नव्हते. प्रेमसंबंध तुटल्यामुळे मुलीने ही तक्रार दाखल केली होती, असा दावा करीत ॲड. जोगडिया यांनी यापूर्वीच्या उच्च न्यायालयाच्या निकालाचा हवाला दिला. जर लग्नाचे आमिष दाखवून व्यक्तीने शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप असेल तर तो बलात्कार ठरत नाही, असे उच्च न्यायालयाने म्हटले होते. त्याचा संदर्भ देत ॲड. जोगडिया यांनी केलेला युक्तिवाद सत्र न्यायालयाने मान्य केला आणि आरोपी तरुणाची बलात्काराच्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली.

पान १ वरुन

## मराठा आणि ओबीसी समाजांवर

हवा, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

**खांद्यावर बंदूक ठेवून फायदा मिळवण्याचा प्रयत्न**

मराठा आरक्षण आंदोलनाला राजकीय वळण दिलं जात आहे का, असा प्रश्न विचारला असता, देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आंदोलनासाठी संसाधने पुरवणारे कोण आहेत, हे सर्वांना दिसत आहे. आम्ही हे आंदोलन सामाजिक दृष्टिकोनातून पाहतो, राजकीय नाही. काही राजकीय पक्ष कोणाच्यातरी खांद्यावर बंदूक ठेवून फायदा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत, पण त्यांचं नुकसानच होईल, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**मराठा समाजासाठी केलेल्या कामांचा वाचला पाढा...**

देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजासाठी आपल्या सरकारनं केलेल्या कामांचा दाखला दिला. मी आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मराठा समाजासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले गेले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ १५ वर्षे का स्थापन झाले नाही? मी ते उभं केलं. आज या महामंडळामुळं दीड लाख उद्योजक तयार झालेत. सारथीच्या माध्यमातून ख-ड, खझड आणि चझडउ विद्यार्थी घडत आहेत, असं त्यांनी सांगितलं.

याचबरोबर महाविकास आघाडी सरकारनं मराठा समाजासाठी काय केलं, असा सवाल करत देवेंद्र फडणवीस यांनी आव्हान दिलं. मराठा समाजासाठी शिक्षण योजना, वसतिगृहे, भत्त्याच्या योजना आम्हीच सुरू केल्या. मविआ सरकारनं अडीच वर्षांत मराठा समाजाच्या हिताचा एकही निर्णय घेतला असेल, तर तो दाखवावा, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## मराठा आरक्षण देणे सरकारची

प्रेरणास्थळे यश आणि प्रेरणा देतात, असे सांगत त्यांनी सरकारला मराठा विरोधी भूमिका सोडण्याचे आवाहन केले. 'आम्ही आरक्षण मिळवणारच, आता थांबणार नाही,' असे ठणकावून सांगताना त्यांनी सरकारला इशारा दिला, 'छत्रपतींच्या विचारांवर चालणारे सरकार मराठ्यांवर गोळ्या घालणार का?'

**...तर तुमचं राजकीय करिअर बरबाद होईल**

आंदोलनासाठी फक्त एका दिवसाची परवानगी देणे ही मराठा समाजाची चेष्टा आहे. फडणवीस यांना सगळ्या महाराष्ट्रासमोर हे सिद्ध करायचे होते की, त्यांनीच आंदोलनाला परवानगी दिली. त्यांनी मोठे मन दाखवायला हवे होते. महायुतीचे सरकार मराठ्यांच्या मतांवरच आले आहे. मी वारंवार सांगितले आहे, आजही तेच सांगत आहे... तुमच्याविरोधात मराठ्यांची लाट वारंवार आली तर, येणारे दिवस तुमचे राजकीय करिअर बरबाद करणारे असतील, असा इशारा जरांगे पाटलांनी दिला.

**फडणवीसांनी संधीचे सोने करावे**

पुढे जरांगे पाटील म्हणाले की, फडणवीसांकडे योग्य संधी आहे आणि त्यांनी संधीचे सोने करावे. राठ्यांची मनं जिंकण्याची संधी आहे. तुम्ही मराठ्यांच्या मागण्यांची अंमलबजावणी करा. मराठे मरेपर्यंत आम्ही दिलेल्या आरक्षणाचे उपकार विसरणार नाही हा आमचा शब्द आहे.

आंदोलनात मस्साजोगचे सरपंच दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख, आंतरवालीचे सरपंच पांडुरंग तारख आणि मारत आंदोलक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'एक मराठा, लाख मराठा' अशा घोषणा देत आंदोलकांनी आरक्षणाची मागणी तीव्र केली.

**शिष्टमंडळ भेटीला तयार**

सरकारचे शिष्टमंडळ भेटण्यासाठी येणार असल्याच्या प्रश्नावर जरांगे म्हणाले, 'आम्ही चर्चेला तयार आहोत. आमचे आंदोलन कायद्याच्या चौकटीत आहे. पण सरकारने आमच्या आंदोलनाला हात लावला, तर मराठा समाज राज्यभर पेटून उठेल.' गणेशोत्सवात अडथळ्याच्या आरोपांना उत्तर देताना त्यांनी प्रतिप्रश्न केला, 'आमच्या हातात बंदुका आहेत का? अंतरवालीत लाठीचार्ज करताना गणपती बसले नव्हते का? आम्ही गोळ्या झेलायला तयार आहोत, पण हटणार नाही.'

## मनोज जरांगेंची हाक अन् आझाद

भव्य स्टेज उभारण्याचे काम सुरू आहे. उद्या जरांगे आझाद मैदानात दाखल होणार असून तत्पूर्वी स्टेज, स्टेजवर बैठक व्यवस्था, साऊंड सिस्टीम, मान्यवरांची भाषणे यांचे प्लॅनिंग जोरात सुरू आहे. मुंबईमध्ये जरांगे पाटील उद्या दाखल होण्यापूर्वीच आझाद मैदानातील संपूर्ण व्यवस्था पार पाडण्यात येत आहे.

तसेच मराठ्यांचा मोर्चा उद्या आझाद मैदानात येण्यापूर्वी वाहनांची पार्किंग नजीकच्या रेल्वे स्थानक परिसरात करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच, उद्या वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी मराठे समाजाची वाहतूक व्यवस्था हाताळणारी समिती रस्त्यावर उतरवून वाहतूक नियंत्रणासाठी पोलिसांना मदत करणार असल्याचे मराठे समाजाचे समन्वयक वीरेंद्र पवार यांनी सांगितले.

## पूरसंकटावर मात करण्यासाठी प्रशासन

विभाग तसेच एनडीआरएफ व एसडीआरएफच्या पथकांना सतत सतर्कतेचा आदेश दिला गेला आहे. बचावनौका, दोरखंड, पथके, तात्पुरती निवारा केंद्रे , औषधोपचार व तातडीचे अन्नधान्य याचा साठा प्रशासनाने करून ठेवला आहे.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शिवकुमार स्वामी यांनी नागरिकांसाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. हवामान विभागाच्या इशाऱ्यांकडे गांभीर्याने लक्ष द्या. नदी, नाले, तलाव यांच्या पातळीतील बदलावर सतत लक्ष ठेवा . लहान मुले, वृद्ध, महिलांची विशेष काळजी घ्या. महत्त्वाची कागदपत्रे, औषधे, रोकड आणि कपडे सुरक्षित ठेवा. विजेच्या तारा, खांब, उपकरणांपासून दूर राहा. दूषित पाणी पिणे टाळा ; उकळलेले किंवा बाटलीबंद पाणीच वापरा. पूराच्या पाण्यातून पायी किंवा वाहनाने जाण्याचे टाळा. प्राण्यांना सुरक्षित ठिकाणी बांधा. प्रशासनाच्या किंवा बचाव पथकाच्या सूचनांचे पालन करा.

# राजधर्माचे पालन करा आणि तातडीने मराठा आरक्षणाची घोषणा करा; दिल्लीतून आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवा: हर्षवर्धन सपकाळ

मुंबई । प्रतिनिधी

सरकारने ठरवले तर पाच मिनिटात मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागू शकतो पण सरकार ते करत नाही. भारतीय जनता पक्ष व देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला दिलेल्या आश्वासन पाळावे. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार आहे. राज्यात प्रचंड मोठे बहुमत असून त्यांनी दिल्लीत जाऊन आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवावी. राजधर्माचे पालन करत तातडीने मराठा समाजाला आरक्षण देण्याची घोषणा करावी, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील समाजासह मुंबईत पोहचत असताना सरकारने या आंदोलनात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. आता केवळ एक दिवसाची परवानगी दिली ती हास्यास्पद असून तीन महिन्याआधी आंदोलनाची घोषणा केली होती तर सरकार एवढे दिवस काय झोपा काढत होते का?

काँग्रेस आघाडी सरकारने मराठा समाजाला आरक्षण दिले होते.



महाराष्ट्र विधिमंडळात भाजपा युती सरकारच्या काळात मराठा आरक्षणाचा ठराव पास केला त्याला काँग्रेस पक्षाने पाठिंबा दिला होता. सत्तेत येताच ७ दिवसात मराठा आरक्षण देतो अशी भीमगर्जना देवेंद्र फडणवीस यांनी केली होती त्याचे काय झाले? धनगर समाजाला मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत आरक्षण देण्याचे आश्वासन फडणविसांनी दिले होते, त्याचे काय झाले? 'सागर' बंगल्यावर मंथन करून अमृत पिऊन विष मात्र समाजावर व विरोधी पक्षावर टाकण्याचे पाप फडणवीस व भाजपा करत आहे. फोडा व राज्य करा या इंग्रजांच्या नितीप्रमाणे भाजपा व फडणवीस काम करत आहे. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना नवी मुंबईत रात्रीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर शपथ घेऊन गुलाल उधळला होता, त्याचे काय झाले? या प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. आज जे तीन पक्ष सत्तेत आहेत तेच त्यावेळीही सत्तेत होते असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

आरक्षणावर जातनिहाय जनगणना हा रामबाण उपाय आहे हे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्पष्ट केले असून त्यासाठी त्यांचा आग्रहही आहे. काँग्रेसशासित तेलंगणा व कर्नाटकात जातनिहाय जनगणना केलेली आहे. भाजपा सरकारमध्ये जर इच्छाशक्ती असेल तर त्यांनीही जातनिहाय जनगणना करावी व मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवावा असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# जरांगे पाटील फॅक्टर सुस्साट!
## आता महायुतीच्या नेत्यांनीच दंड थोपटले; आंदोलनाला जाहीर पाठिंबा

मुंबई । प्रतिनिधी

आंदोलनाची तीव्रता कमी व्हावी, यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू असताना आता सत्ताधारी महायुतीमधील काही नेत्यांनी या आंदोलनाला जाहीरपणे पाठिंबा दिला आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी इथून मुंबईकडे निघालेले मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे आज रात्री उशिरा मुंबईत पोहोचणार असून उद्या सकाळी ते आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणास सुरुवात करणार आहेत.

**सरकारची कोंडी होणार**



आरक्षण प्रश्नावरून मनोज जरांगे हे सरकारविरोधात आक्रमक झाले असून लाखो समर्थकांसह ते मुंबईत येत असल्याने सरकारची कोंडी होणार आहे. जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी आणि त्यांच्या आंदोलनाची धार कमी करण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू असताना आता सत्ताधारी महायुतीत नेत्यांकडूनही या आंदोलनाला जाहीरपणे पाठिंबा दिला जाऊ लागला आहे. महायुतीतील कोणी-कोणी दिला आंदोलनाला पाठिंबा?

**१. आमदार हेमंत पाटील-** मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील हे मुंबईला रवाना झाले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार हेमंत पाटील यांनी देखील या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत समाजातील शेवटच्या माणसाला न्याय मिळाला पाहिजे असं मत त्यांनी व्यक्त केलं आहे. सर्वच मराठा समाज श्रीमंत नाही, तळागाळातल्या मराठा समाजाची मागणी योग्य असल्याचे आमदार हेमंत पाटील म्हणाले.

**२. आमदार विलास भुमरे-**एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे खासदार संदिपान भुमरे यांचे चिरंजीव आमदार विलास भुमरे यांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. पैठण येथून जाणाऱ्या जरांगे पाटील यांच्या मोर्चाचं स्वागतही भुमरे यांनी केलं आहे.

**३. आमदार राजू नवघरे-**हिंगोलीच्या वसमत तालुक्याचे अजित पवार राष्ट्रवादीचे आमदार राजू नवघरे यांचा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा.

**४. अनिल जगताप-**एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अनिल पाटील यांनी मराठा आरक्षणाला जाहीर पाठिंबा दिला आहे. तसंच चलो मुंबईचा नारा देत आपण आंदोलनात सहभागी होत असल्याचं सांगितलं आहे.

**५. सचिन मुळूक-**एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे बीडमधील दुसरे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनीही मराठा आरक्षण आंदोलनाचं समर्थन केलं आहे.

**६. महेंद्र धुरगुडे –** धाराशिव जिल्हाध्यक्ष , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार)

गरजवंत मराठ्यांना आरक्षण मिळालेच पाहिजे. त्यासोबत इतर समाजाला देखील आरक्षण देण्यात यावे. मनोज जरांगे पाटील यांना आमचा पूर्ण पाठिंबा आहे. मनोज जरांगे पाटील हे गरजवंत मराठा समाजासाठी लढा देत आहेत, त्या लढ्यात आम्ही देखील सामील आहोत. आरक्षण देताना इतरांच्या आरक्षणाला धक्का न लावता आरक्षण द्यावे, अशी भूमिका धाराशिवमील अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांनी मांडली आहे.

**७. सूरज साळुंखे,** जिल्हाध्यक्ष, शिवसेना (शिंदे)

मराठा आरक्षणाला पाठिंबा मिळावा यासाठी आम्ही मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत आहोत. आरक्षणासंदर्भात आमचा मनोज जरांगे पाटील यांना पूर्ण पाठिंबा आहे. जेवढ्या इतर गोष्टी महत्त्वाच्या आहेत, तेवढेच आम्हाला आरक्षण देखील महत्त्वाची आहे. आमच्या समाजाचा आरक्षणाचा लढा अण्णासाहेब पाटील यांच्यापासून सुरू आहे. हा लढा पन्नास वर्षापासूनचा आहे. त्यामुळे आम्ही जरांगे पाटील यांच्या भूमिकेसोबत आहोत, असं ठाम मत व्यक्त करत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे धाराशिव जिल्हाध्यक्ष सूरज साळुंखे यांनी मनोज जरांगेंचे जोरदार समर्थन केलं आहे.

**८. योगेश क्षीरसागर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार)** –अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे बीड विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष योगेश क्षीरसागर यांनीही जरांगे पाटील यांची भेट घेत मराठा आरक्षण आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

# .तर आज चित्र वेगळं असतं, ती आमची मोठी चूक झाली, विनोद पाटलांचं मनोज जरांगेंबद्दल मोठं वक्तव्य

मुंबई । प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावं, यासाठी मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा अमरण उपोषण करणार आहेत. त्यासाठी मराठा आंदोलक मोठ्या संख्येनं मुंबईच्या दिशेनं निघाले आहेत. मुंबईच्या आझाद मैदानावर मराठा बांधवांचं आंदोलन होणार आहे.

या पार्श्वभूमीवर बोलताना आता विनोद पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

जरांगे पाटील हे माझे भाऊ आहेत. मित्र आहेत. त्याच काळात त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली नसती आणि निवडणूक लढवली असती तर आज आमचं चित्र वेगळं असतं, असं विनोद पाटील यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की. आम्ही निवडून आलो असतो, पडलो असतो, पण राज्यामध्ये एक राजकीय दबदबा राहिला असता. आज निवडणुका निघून गेल्या आहेत.

निश्चितपणे त्यांनी निवडणुकीतून माघार घ्यायला नको होती. मात्र त्यावेळी मिस्टेक झाली आणि आमची मोठी चूक झाली. आम्ही जर निवडणूक लढवली असती, कमी जास्त मत पडली असती, परंतु त्या -त्या भागामध्ये आमचं एक नेतृत्व तयार झालं असतं आणि राजकीय पक्षांना सुद्धा दखल घ्यावी लागली असती, असंही यावेळी विनोद पाटील यांनी म्हटलं आहे.

माझी भावना एकच आहे, मी न्यायालयाची लढाई लढतो आहे. मुंबई हायकोर्टात आम्ही जिंकलो परंतु सुप्रीम कोर्टात हरलो. मनोज जरांगे पाटील सुद्धा रस्त्यावरची लढाई लढत आहेत. त्यामुळे आमच्या दोघांचा उद्दिष्ट एकच आहे. की मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे. रस्त्यावरची लढाई सुद्धा महत्त्वाची आहे आणि न्यायालयीन लढाई सुद्धा महत्त्वाची आहे. समितीला मुदतवाढ देण्याची पद्धत आहे. ते जितक्या वेळेस मागतील तितक्या वेळेस द्यावी लागेल, अशी प्रतिक्रिया यावेळी विनोद पाटील यांनी दिली आहे.

# ईद ए मिलादुन नबीसाठी ८ सप्टेंबरला शासकीय सुट्टी द्या

**मुंबई । प्रतिनिधी**

मुस्लीम समाजाचा पवित्र असा मोहम्मद पैगंबर साहेबांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर रोजी आहे तर ६ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन आहे, त्यामुळे ५ तारखेची मोहम्मद पैगंबर जयंतीची मिरवणूक ८ सप्टेंबर रोजी घेण्याचा निर्णय मुस्लीम समाजाने घेतलेला आहे, याची नोंद घेऊन ५ सप्टेंबर रोजी जाहीर केलेली शासकीय सुट्टी ८ सप्टेंबर रोजी द्यावी, अशी मागणी काँग्रेस वर्किंग कमिटीची सदस्य व माजी मंत्री, नसीम खान यांनी केली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात नसीम खान म्हणतात की, राज्यात बंधुभाव व हिंदू मुस्लीम एकोपा अबाधित राखण्यासाठी मुंबईत विविध मुस्लीम संघटनांनी गुरुवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी ऑल इंडिया खिलापत कमिटीमध्ये बैठक घेतली. मोहम्मद पैगंबर यांच्या जन्मदिनी मुंबईत काढण्यात येणारी मिरवणूक ही सोमवार दिनांक ८ सप्टेंबर रोजी काढण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला आहे, जेणेकरून दोन्ही धर्माचे पवित्र सण हे प्रेम व सद्भावनेने साजरा करता येतील, असे नसीम खान यांनी म्हटले आहे.

# उत्साहपूर्ण वातावरणात 'दगडूशेठ' गणपतीसमोर ३५ हजार महिलांचं अथर्वशीर्ष पठण आणि महाआरती



पुणे । प्रतिनिधी

'ओम नमस्ते गणपतये... ओम गं गणपतये नमः... मोरया, मोरया...' च्या जयघोषाने गुरुवारी पहाटेच्या सुमारास पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पाच्या समोर तब्बल ३५ हजार महिलांनी एकत्र येत अथर्वशीर्ष पठणातून गणरायाला नमन केलं.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळच्या वतीनं उत्सवाच्या १३३ व्या वर्षीनिमित्त गुरुवारी पहाटे जवळपास ३५ हजार महिलांनी उत्सव मंडपासमोर अथर्वशीर्ष पठण केलं. यावेळी खासदार सुनेत्रा पवार तसेच मंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**उपक्रमाचे यंदा ४० वे वर्ष**

पारंपरिक वेशात मध्यरात्री १२ वाजल्यापासून महिलांनी या उपक्रमाकरीता हजेरी लावण्यास सुरुवात केली होती. बाप्पाच्या नामाचा जयघोष यावेळी उपस्थित महिलांनी केला. यावेळी पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंडळाच्या उत्सव मंडपापासून ते मंदिराच्या परिसरापर्यंत महिलांनी अथर्वशीर्ष पठणाकरीता गर्दी केली होती. या उपक्रमाचे यंदा ४० वे वर्ष असून, गुरुवारी पहाटे कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिलांनी शंखनाद करत अथर्वशीर्ष पठण केलं. यानंतर गणेश जागर गीत, ओंकार जप आणि मुख्य अथर्वशीर्ष पठण करत गणरायाला नमन करण्यात आलं. यावेळी गणेश नामाचा गजर करताना प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावरील उत्साह ओसंडून वाहत होता. तसेच भक्तिरसात तल्लीन झालेल्या वातावरणात कार्यक्रमाची सांगता महाआरतीने करण्यात आली.

देशातील तसेच राज्यातील सर्व जनतेला गणेशोत्सवाच्या खूप खूप शुभेच्छा. गुरुवारची पहाट ही अतिशय सुंदर अशी होती. एवढ्या मोठ्या संख्येने महिला या अथर्वशीर्ष पठणसाठी येथे जमल्या. बाप्पाच्या चरणी हीच प्रार्थना केली की, देशावर तसेच राज्यावर जे काही संकट आलं असेल ते दूर होऊ दे आणि प्रत्येक जनतेला सुखी ठेव आणि सगळ्यांना चांगलं आरोग्य लाभू दे. **- सुनेत्रा पवार, खासदार**

# कबुतरांसाठी आंदोलनाला परवानगी, मग मराठा समाजाला का नाही?; संजय राऊतांचा सवाल

मुंबई । प्रतिनिधी

मराठा समाजाच्या आंदोलनाला मुंबईत केवळ एकदिवसीय परवानगी देण्यावरून शिवसेना (उबाठा) नेते संजय राऊत यांनी गुरुवारी (२८ ऑगस्ट) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली आहे. यावेळी मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी शब्दाला जागून आंदोलकांशी संवाद साधावा, अशी मागणी संजय राऊतांनी केली. तसंच मुंबईत कबुतरांसाठी आंदोलनाला परवानगी मिळते, मग मराठा समाजाला का नाही? मुंबई ही मराठी माणसांची राजधानी आहे. त्यांना आपल्या मागण्यांसाठी आंदोलनाचा अधिकार आहे, असं संजय राऊत यांनी सांगितलं.

संजय राऊत यांनी मराठा समाजाच्या मागण्यांचा मुद्दा उपस्थित करताना सत्ताधारी महायुती सरकारवर जाती-जातींमध्ये भेद निर्माण करण्याचा आरोप केला. गेल्या दहा वर्षांत मराठी माणसांची एकजूट तोडण्याचं काम झालं. बाळासाहेब ठाकरे यांनी मराठा, ब्राह्मण, घाटी, कोकणी अशी एकजूट उभारली होती, ती मोडण्याचं राजकारण फडणवीस यांनी सत्तेसाठी केलं, असा घणाघात संजय राऊत यांनी केला. तसंच मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यामागे मोठा समाज आहे. त्यांच्या रोजगार, आर्थिक



अडचणींसंदर्भातील मागण्या सरकारनं गांभीर्यानं घ्याव्यात, असं संजय राऊतांनी नमूद केलं.

**आता नेहरूंवर खापर फोडून चालणार नाही**

मराठा समाजाला त्यांच्या मागण्यांसाठी मुंबईत येऊन आंदोलन करण्याचा अधिकार आहे. जरांगे पाटील हे कोणत्या परदेशी नेत्याकडे मागण्या करणार? सरकारनं त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे, असं संजय राऊत यांनी सांगितलं. तसंच मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर विरोधक गप्प नसल्याचं सांगताना त्यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी यासंदर्भात वारंवार भूमिका मांडल्याचं स्पष्ट केलं. गेल्या दहा वर्षांपासून केंद्रात नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्रात फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न केंद्राच्या अखत्यारित आहे. आता नेहरूंवर खापर फोडून चालणार नाही, असा टोला संजय राऊत यांनी लगावला.

**सरकारनं जरांगेंशी संवाद साधावा**

राधाकृष्ण विखे पाटील, एकनाथ शिंदे यांच्यासारख्या नेत्यांनी सत्तेत असताना मराठा समाजाच्या मागण्यांकडे लक्ष द्यावं. लाखो मराठी माणूस मुंबईत आंदोलनासाठी आला तर त्यांच्याशी संवादाशिवाय शांतता प्रस्थापित होणार नाही. गणेशोत्सव असला तरी आंदोलनाला परवानगी देण्याचा निर्णय सरकारच्या हातात आहे. फडणवीस आणि उपमुख्यमंत्र्यांनी जरांगे पाटील यांच्याशी थेट चर्चा करावी, अशी मागणी संजय राऊत यांनी केली. तसंच येत्या काळात वातावरण बिघडू नये, यासाठी सरकारनं तातडीनं पावलं उचलावीत, असंही त्यांनी सुचवलं.

# अरुण गवळीला सुप्रीम कोर्टाकडून जामीन मंजूर

मुंबई । प्रतिनिधी

आताच्या घडीची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. कमलाकर जामसंडेकर हत्या प्रकरणात अरुण गवळीला सुप्रीम कोर्टाकडून जामीन मंजूर झाला आहे. त्यामुळे अरुण गवळी याच्यासाठी हा मोठा दिलासा आहे.

अरुण गवळीकडून वारंवार जामीनासाठी अर्ज केला जात होता. अखेर सुप्रीम कोर्टाकडून त्याला जामीन मंजूर झाला आहे. अरुण गवळीने विविध कारणास्तव जामीनासाठी अर्ज केला होता. पण कोर्टाने अनेकदा जामीन अर्ज फेटाळला होता. अखेर आता सुप्रीम कोर्टाने अरुण गवळीचा जामीन अर्ज मंजूर केला आहे.

# 'सरकारवर आमची नजर, गरज पडल्यास मुंबई गाठू...', ओबीसी नेत्याची मोठी घोषणा ; फडणवीसांची कोंडी

नागपूर । प्रतिनिधी

ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा संघर्षाची भूमिका घेण्यात आली आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी यांनी स्पष्ट केलं की, 'ओबीसी समाजाला मिळालेलं आरक्षण कुठल्याही परिस्थितीत धोक्यात येऊ देणार नाही.



मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण देणं, सरसकट कुणबी प्रमाणपत्र वाटप करणं, हे अन्यायकारक' असल्याचं ते म्हणाले.

**सरकारचं लक्ष वेधलं जाईल**

तायवाडे यांनी सांगितलं की, 'आज ऑफलाईन आणि ऑनलाइन अशा दोन्ही बैठका घेऊन आगामी आंदोलनाची रूपरेषा ठरवण्यात आली. उद्यापासून जिल्हानिहाय पत्रकार परिषदा घेऊन पदाधिकारी जनजागृती करतील. परवा नागपुरातील संविधान चौकात साखळी उपोषण सुरू करण्यात येईल. त्यानंतर विविध जिल्ह्यांमध्ये निदर्शने, धरणे यांचे आयोजन करून सरकारचं लक्ष वेधलं जाईल.

आमची सरकारवर नजर

'सरकारने आजवर ओबीसी आरक्षणाबाबत ठाम भूमिका घेतली आहे. मुख्यमंत्री यांनी १० टक्के आरक्षणाबाबत भूमिका मांडल्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. परंतु आंदोलकांच्या दबावतंत्रामुळे सरकार कुठे झुकते का, यावर आमची नजर आहे. सरकारने ठाम राहिलं पाहिजे,' असे तायवाडे म्हणाले.

**मुंबई गाठण्यासाठी तयारी करु**

ते पुढे म्हणाले, 'शेतकरी हा ओबीसी समाजाचा घटक आहे. त्याला योग्य ती नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या मागण्या देखील सरकारसमोर रेटल्या जातील. समाजाच्या हक्कांसाठी लढा देणं अपरिहार्य आहे.' आंदोलनाची दिशा स्पष्ट करताना तायवाडे यांनी सांगितलं की, 'सुरुवात साखळी उपोषणाने केली जाईल आणि गरज पडल्यास मोठ्या संख्येने मुंबई गाठली जाईल. १५ तारखेपासून मुंबई गाठण्यासाठी वातावरण तयार केलं जाईल. राज्यभरातून ओबीसी बांधव मुंबईत एकत्र येऊन सरकारचे लक्ष वेधतील,' अशी घोषणा त्यांनी यावेळी केलीय.

'सध्या विधानसभेत ९० पेक्षा अधिक ओबीसी आमदार आहेत. त्यांनी समाजाच्या पाठीशी उभे राहून ठाम भूमिका घ्यावी', असं आवाहन तायवाडे यांनी केलं. 'सरकारला आमच्या मागण्या लेखी स्वरूपात द्याव्या लागतील. अन्यथा ओबीसी समाज तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारेल,' असा इशाराही यावेळी बबनराव तायवाडे यांनी दिला. दरम्यान, तायवाडे यांच्या घोषणेमुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कोंडी झाल्याचं पाहायला मिळत आहे.

# श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून संपूर्ण राज्यात नागरिकांची आरोग्य तपासणी; ई-मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचा पुढाकार

**मुंबई । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.

या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे.

**नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता**

शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्यावतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, स्थानिक वैद्यकीय महाविद्यालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांची संपूर्ण टीम सक्रिय सहभागी झाले आहेत.

**गणेशमंडळांकडून व्यापक जनजागृती**

नागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळावी यासाठी मागील आठवडाभर गणेश मंडळांकडून बॅनर, पत्रकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू आहे. परिणामी या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि भाविक पुढे येत आहेत. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे.

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना आहे. 'श्री गणेशा आरोग्याचा' या उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळत आहे. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार आहेत. हा उपक्रम म्हणजे आरोग्यसेवेतील लोकाभिमुख आणि जनहिताचा उत्तम आदर्श ठरत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

# नागरिकांनी पावसाळ्यात सुरक्षिततेची दक्षता घ्यावी

बीड । प्रतिनिधी

सद्यस्थितीत मान्सून सक्रिय असून बीड जिल्ह्यात ठिकविकाणी मुसळधार पावसामुळे नद्या, नाले, ओढे व पाणलोट क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह सुरू आहे. परिणामी अनेक ठिकाणी पुलावरून पाणी वाहत असून नागरिकांकडून निष्काळजीपणामुळे अपघातांच्या घटना घडत आहेत. सदर परिस्थितीचा विचार करून जिल्हा प्रशासनामार्फत सर्व नागरिकांना खालीलप्रमाणे आवाहन व दक्षता सूचना करण्यात आल्या आहेत.

नागरिकांनी पावसाळ्यात पुढील प्रमाणे दक्षता घ्यावी. मुसळधार पाऊस सुरू असतांना अनावश्यक प्रवास टाळावा. पुराचे पाणी पुलावरून वाहत असल्यास पूल ओलांडू नये. पुराच्या पाण्यात पोहण्याचा प्रयत्न करू नये. पाण्याच्या खोलीचा अंदाज नसेल तर पाण्यात जाऊ नये. पुलावरून किंवा नाल्यांवरून पाणी वाहत असल्यास पूर पाहण्यासाठी नागरीकांनी तेथे गर्दी करु नये, तसेच नदीकाठ, ओढ्याकाठ किंवा धोकादायक ठिकाणी सेल्फी / फोटो काढण्याचा मोह टाळावा. नदीकाठच्या गावातील नागरिकांनी दक्ष रहावे, नदीच्या पाणी पातळीत वाढ होत असल्यास नदीपात्रापासून दूर जावे. पावसाच्या वेळी मुलांना नाल्याजवळ, नदीकाठी किंवा धरण परिसरात जाण्यास परवानगी देऊ नये. धरण क्षेत्र, बंधारे व जलाशय परिसरात पाण्याचा विसर्ग होवू शकतो, त्यामुळे त्या ठिकाणी गर्दी करणे टाळावे. वीज पडत असल्यास झाडाखाली किंवा मोकळ्या जागेत थांबू नये. पुराच्या वेळी पाळीव प्राण्यांना बांधून ठेवू नये. सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. ग्रामपंचायत, पोलीस पाटील, तलाठी किंवा स्थानिक प्रशासनाकडून मिळणाऱ्या सूचनांचे पालन करावे. पावसामुळे घरात पाणी शिरण्याची शक्यता असल्यास वीजपुरवठा बंद करून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे, तसेच जमिनीखालून जाणाऱ्या विद्युत तारांपासून सावध राहावे.दुषित पाणी पिऊ नये, पिण्याचे पाणी उकळून प्यावे व जेवणाआधी हात स्वच्छ धुवून घ्यावे. पूर ओसरल्यानंतर परिसर स्वच्छ करण्यासाठी प्रशासनास सहाय्य करावे व परिसर स्वच्छ ठेवावा, रोगराई पसरू नये याकरिता आरोग्य विषयक खबरदारी घ्यावी. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी (१०७७) त्वरित संपर्क साधावा.

नागरिकांनी या कालावधीत निष्काळजीपणा टाळून आपल्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. जिल्हा प्रशासन सर्वतोपरी दक्ष आहे. मात्र आपत्ती टाळण्यासाठी नागरिकांचे सहकार्य व सतर्कता अत्यावश्यक आहे, असे शिवकुमार स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

# मांजरा धरणाचे ६ दरवाजे अर्ध्या मीटरने उघडले; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

केज । प्रतिनिधी

धनेगाव (ता. केज) येथील मांजरा प्रकल्प भरला आहे. त्यामुळे आज (दि. २८) सकाळी ९ वाजता धरणाचे सहा दरवाजे अर्ध्या मीटरने उघडले आहेत. नदीकाठाच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात आणि मांजरा नदी पात्र व पाणलोट क्षेत्रात बुधवारी (दि. २७) रात्री ८ च्या सुमारास दमदार पाऊस पडला. त्यामुळे आज सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास धनेगावच्या मांजरा नदीवर असलेल्या मांजरा प्रकल्पाचे वक्र दरवाजे क्र १, २, ३, ४, ५ व ६ हे एकूण सहा दरवाजे हे ०.५० मीटरने



उघडल्याची माहिती मांजरा प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

या सहा दरवाज्यातून मांजरा नदीपात्रात १०४८२.८४ क्युसेक (२९६.८८ क्युमेक्स) एवढा विसर्ग सोडण्यात आला आहे. पाण्याची आवक बघून विसर्ग कमी अथवा जास्त करण्यात येईल. नदी काठच्या जनतेने सतर्क रहावे, असे आवाहन प्रशासन आणि मांजरा प्रकल्प धनेगावचे अभियंता पाटील यांनी केले आहे.

# वाण नदीच्या पुलावरुन कार-रिक्षा वाहून गेले

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यात बुधवारी (दि.२७) रोजी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे वाण नदीला पूर आला असून धारूर-आसरडोह आणि धारूर-आडस मार्गावरील दोन्ही पूल पाण्याखाली गेले आहेत. या पाण्याच्या प्रवाहात रात्री चारचाकी आणि रिक्षा वाहून गेल्याने दोघे बेपत्ता होण्याच्या दोन घटना घडल्या आहेत. दरम्यान, यातील एकाच मृतदेह सापडला असून अद्याप एकजण बेपत्ता आहे.



गेल्या दोन दिवसांपासून तालुक्यात मुसळधार (ठरळप) पाऊस सुरू आहे. तांदळवाडी धरण भरून वाहत असून त्यामुळे आवरगाव व अंजनडोह येथील पूल पाण्याखाली गेले आहेत. बुधवारी रात्री रुईधारुरहून अंजनडोहकडे (ऊहर्ीी) जाताना रात्री आठ वाजता आडत व्यापारी नितिन शिवाजीराव कांबळे (वय ४२) यांची कार पुलावरून वाहून गेली. प्रशासन, पोलीस व गावकऱ्यांनी रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम राबवली. अखेर गुरुवारी सकाळी सहा वाजता पुलापासून एक किलोमीटर अंतरावर त्यांच्या मृतदेहाचा शोध लागला.

**आवरगाव येथे तरुण बेपत्ता**

दरम्यान, आवरगाव पुलावरूनही रात्री बारा वाजता एक रिक्षा वाहून गेल्याचे वृत्त समोर आले आहे. या अपघातात अनिल बाबूराव लोखंडे ( २६ ) हा तरुण बेपत्ता असून त्याचा शोध सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना इशारा दिला आहे की, नदी, नाला किंवा ओढा ओलांडताना पाण्याची पातळी धोकादायक नाही याची खात्री करूनच प्रयाण करावे.

# कारचा अपघात झाला आणि पोलिसांच्या हाती लागला तब्बल २१ लाखांचा गांजा!

बीड । प्रतिनिधी

एका कार अपघातानंतर पोलिसांनी तपासणी केली असता अपघातग्रस्त कारमधून तब्बल १०५ किलो गांजा सापडल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या गांजाची किंमत तब्बल २१ लाख १५ हजार रुपये इतकी असून पोलिसांनी दोन जणांना अटक करून त्यांच्यावर गुन्हा नोंदविला आहे.

माहितीनुसार, पाटोदा येथील एका घरफोडीच्या गुन्ह्याच्या तपासासाठी पोलिसांची टीम २६ ऑगस्ट रोजी सकाळी सातच्या सुमारास गस्त घालत असताना त्यांना भरधाव वेगाने जाणारी मारुती सुझुकी सियाज गाडी संशयास्पद वाटली. काही वेळातच हीच कार मौजे हनुमानवस्ती येथे अपघातग्रस्त



झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. वाहनाजवळ पोहोचलेल्या पोलिसांना कारमधून येणाऱ्या वासावरून गांजा सदृश्य अंमली पदार्थ असल्याचा संशय आला. तपासणी केली असता कारमध्ये काळ्या रंगाच्या पाच गोण्या आढळल्या.

यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या कारवाईत तब्बल २१ लाख १५ हजार रुपये किमतीचा १०५ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणात बाबासाहेब विश्वनाथ दहातोंडे (रा. चांदा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) आणि दत्तु मुरलीधर सकट (रा. टाकळी खंडेश्वरी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) यांना अटक करण्यात आली. दोघांनीही हा गांजा नेवासा येथून विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली आहे. पोलिसांना पाहून घाबरल्यामुळे त्यांनी कार पळवली आणि अपघात झाला, असे त्यांनी सांगितले. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात छऊझड कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींपैकी दत्तु सकट याला न्यायालयाने १ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही धडक कारवाई सहायक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे, पोलीस उप निरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार सोमनाथ गायकवाड, अनंत मस्के, राहुल शिंदे, मनोज जोगदंड, सतिश मुंडे, संभाजी भिल्लारे, अशपाक सय्यद, अर्जुन यादव, अंकुश वरपे, मनोज परजने, नितीन वडमारे, सिद्धार्थ मांजरे यांनी केली

# जागेच्या वादातून मायलेकीसह तीन जणांना लोखंडी रॉडने मारहाण

बीड । प्रतिनिधी

बीड शहरा जवळील चऱ्हाटा येथे मायलेकीसह तिघींवर चार ते पाच जणांच्या टोळक्याकडून लोखंडी पाईप आणि रॉडने मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडलीय. या अमानुष मारहाणीचा व्हिडिओ नुकताच समोर आला आहे.

जागेच्या कारणावरून शिवीगाळ करत चार ते पाच जणांच्या टोळक्याने मायलेकीसह इतर तिघींवर लोखंडी पाईप आणि रॉडने हल्ला केला.

मारहाणीचे हे दृष्य मन विचलित करणारे आहेत. जीव वाचवण्यासाठी त्या आकांतने ओरडत होत्या, तरीही राक्षसी वृत्तीच्या नराधमांना कसलीही दया आली नाही. या हल्ल्यामध्ये दोघी जखमी झाल्या असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत असल्याचंही सांगण्यात आलं आहे.

रिजवाना शेख बबनीन आणि शेख निलफोर शेख हरून या तिघींना गावातीलच चार ते पाच जणांनी संगणमत करून बेदम मारहाण केली. घराचं बांधकाम सुरू असलेल्या जागेवरून हा वाद झाला आणि या वादानंतर यांना ही अमानुष मारहाण झाली आहे. महिलांना अमानुष मारहाण होत असल्यानं जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हा दिवसेंदिवस गंभीर बनत चालला असल्याचं समोर येत आहे. अशा परिस्थितीत पोलिस प्रशासन काय पाऊले उचलणार? आता हे पाहणं महत्वाचं आहे.

# *परळीतील बिबदरा पाझर तलाव फुटला*

*परळी । प्रतिनिधी*

*सततच्या पावसामुळे बोरणा नदीवरील भोजनकवाडी नागदरा येथील बिबदरा पाझर तलाव गुरुवार (दि.२८) रोजी सकाळी फुटला आहे. तलावाखालील शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे.*

*३५ वर्षापूर्वी माजी ग्रामविकास राज्य मंत्री पंडितराव दौंड यांच्या मंत्रीपदाच्या काळात बिबदरा पाझर तलाव बांधण्यात आला होता. या तलावाच्या दुरुस्तीची शेतकऱ्यांनी अनेकदा मागणी केली होती. परंतु, पाटबंधारे विभागाने दुर्लक्ष केल्याने पाझर तलाव फुटून शेतजमीनी वाहून जाऊन अतोनात नुकसान झाल्याचा आरोप माजी आमदार संजय दौंड यांनी केला आहे. परळी तालुक्यातील नंदनज येथील बोरणा मध्यम प्रकल्प २४ ऑगस्ट रोजी ओव्हरफ्लो झाला असून, प्रकल्पाच्या सांडव्यावरून पाणी वाहू लागले आहे. या जलसाठ्यामुळे बोरणा मध्यम प्रकल्पाखालील नंदनज, कासारवाडी, सारडगाव ,मिरवट, मांडवा व इतर गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. तसेच सारडगाव व नंदनज परिसरातील शेतकऱ्यांच्या सिंचन क्षमतेतही वाढ झाली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही नंदनज येथील बोरणा प्रकल्प शंभर टक्के भरल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दरम्यान, सततच्या पावसामुळे बोरना नदीवरील भोजनकवाडी नागदरा येथील बिबदरा पाझर तलाव गुरुवारी सकाळी फुटला आहे. त्यामुळे तलावाखालील शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान झाले आहे.*

# गप्पेवाडीत वृद्ध महिलेसह भाच्यावर हल्ला, नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील गप्पेवाडी येथे कौटुंबिक वादातून एका वृद्ध महिलेसह तिच्या भाच्यावर गावातील काही लोकांनी हल्ला केला. शिवीगाळ, दगड व काठ्यांनी मारहाण तसेच जिवे मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी नऊ जणांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सरस्वती सुभाष जाधवर (वय ६५, रा. गप्पेवाडी, ता. केज) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या २४ ऑगस्ट रोजी सकाळी आठच्या सुमारास भावाच्या घरी राहत असताना भावाची सुन मीन संतोष केदार, बाळासाहेब आसुबा केदार, बळीराम विठ्ठल केदार यांनी काही जणांना सोबत घेऊन घरासमोर येऊन त्यांना घर सोडून जाण्यास धमकावले. त्यानंतर सरस्वती जाधवर व त्यांचा भाचा दिलीप केदार यांना शिवीगाळ करून दगड व काठ्यांनी मारहाण केली.

आरडाओरडा झाल्यावर गावातील हनुमंत केदार, भीमंत केदार, आनंद शंकर केदार, बालाजी केदार यांनी धाव घेऊन भांडण सोडवले. जखमींना तत्काळ सरकारी दवाखाना, केज येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

या प्रकरणी मीन संतोष केदार, बाळासाहेब आसुबा केदार, बळीराम विठ्ठल केदार, अनिल राम नेहरकर, बंडु राम नेहरकर, राम शंकर नेहरकर, पांडुरंग साहेबराव केदार, विलास आसुबा केदार व आसुबा बाबु केदार यांच्याविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार पुरुषोत्तम शेप करत आहेत.

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप-प्रादेशिक अधिकारी दर बुधवारी बीड येथे उपलब्ध राहणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील उद्योजकांच्या तसेच औद्योगिक संघटनांच्या अडी-अडचणी / समस्यावरील चर्चा करणेसाठी व निवारण करणेसाठी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना हे आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी, जिल्हा उद्योग केंद्र, संचेती बिल्डिंग, गुड लक हॉटेल जवळ, एम.एस.ई.बी. ऑफिस समोर, जालना रोड, बीड येथे उपलब्ध असतील. असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ छत्रपती संभाजीनगरचे प्रादेशिक अधिकारी यांनी कळविले आहे.

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी दर बुधवारी बीड येथे उपलब्ध राहणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील उद्योजकांच्या तसेच औद्योगिक संघटनांच्या अडी-अडचणी/समस्यावरील चर्चा करणेसाठी व निवारण करणेसाठी प्रादेशिक अधिकारी, छत्रपती संभाजीनगर हे आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी बीड येथील महामंडळाच्या उपअभियंता यांचे कार्यालयात उपलब्ध असतील. असे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगरचे प्रादेशिक अधिकारी यांनी कळविले आहे.

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे उत्तराधिकारी व सचिवपदी महंत शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती यांची निवड; लिंबागणेशकरांकडून भव्य मिरवणूक व सत्कार सोहळा

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान, बेलगाव या प्राचीन व ऐतिहासिक संस्थानच्या उत्तराधिकारी पदी व सचिव पदाची सूत्रे महंत शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती यांच्याकडे सोपविण्यात आली. या निवडीचे स्वागत करत लिंबागणेश गावात भाविकांच्या वतीने जेसीबीद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली तसेच भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले.



या सोहळ्यावेळी बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. महादेव महाराज भारती तसेच गुरूवर्य धर्मराज दादा सामनगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मिरवणुकीदरम्यान डोल-ताशे, ढोल-लेझीम, टाळ-मृदुंगाचा गजर आणि भगव्या पताक्यांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले. शांतीब्रह्म महाराज की जय या घोषणांनी गावात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गावातील तरुण मंडळींनी विशेष परिश्रम घेतले. प्रतिष्ठित नागरिक आणि पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून नव्या महंतांचे उत्साहात स्वागत केले.

**निस्वार्थी सेवेमुळे संस्थानचा विकास-गुरूवर्य धर्मराज दादा सामनगावकर**

या प्रसंगी बोलताना गुरूवर्य धर्मराज दादा सामनगावकर म्हणाले की, श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान हे भाविकांच्या श्रद्धेचे स्थळ असून निस्वार्थपणे परमार्थासाठी जीवन समर्पित करणारे महात्मे लाभल्याने संस्थानचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे. महंत तुकाराम महाराज भारती यांनी दिंडी सेवा व कार्यातून संस्थेची सेवा केली आणि भाविकांना एकत्रित करण्याचे कार्य केले. अगोदर सेवा आणि त्यानंतर कारभार हाती घेतल्याने भाविकांचा विश्वास वाढला आहे. सर्व मान्यवर संतांचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी आहेत. सेवाभावातून बेलेश्वर संस्थेची महती व विकास याला निश्चितच गती मिळेल.

नव्या महंतांच्या निवडीमुळे संस्थानच्या धार्मिक व सामाजिक कार्याला अधिक दिशा व गती मिळेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# ३१ ऑगस्ट भटके-विमुक्त दिनानिमित्त बीड जिल्ह्यात पूर्वतयारी बैठक संपन्न

## जिल्हातील भटके विमुक्त समाज बांधवानी सहभागी व्हावे-ओमप्रकाश गिरी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस भटके-विमुक्त दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, याचे भटके-विमुक्त बांधवांकडून उत्साहात स्वागत करण्यात येत आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी बीड जिल्ह्यात भटके-विमुक्त विकास परिषदेच्या माध्यमातून एका पूर्वतयारी बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीला भटके-विमुक्त विकास परिषदेचे देवगिरी प्रांत संयोजक उमेश जीजोगी, डॉ. सुभाष जोशी, श्री महंत दत्ता महाराज गिरी, भटके-विमुक्त मित्र मंडळाचे बालाजी पवार, डॉ. कैलास जी पैठणकर, अतुल जी घोरड, जिल्हा संयोजक ओमप्रकाश गिरी, अक्षय तट, संध्या राजपूत, प्रीत कुकडे, राजेंद्र बन साहेब,जिल्हा अभियान प्रमुख बबन जी गिरी, भगवान पवार, बाजीराव गिरी, अनघा प्रकाश, उत्तम गायकवाड, नेहा माळी यांच्यासह परिषदेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत ३१ ऑगस्ट रोजी भटके-विमुक्त दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी पूर्वनियोजन करण्यात आले. शासनाच्या विविध विभागांमार्फत भटके-विमुक्त समाजासाठी उपलब्ध असलेल्या योजनांची माहिती देण्याचे नियोजन करण्यात आले. तसेच, आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान कार्ड आणि जात प्रमाणपत्र यांसारख्या मूलभूत सुविधा अविरतपणे उपलब्ध करून देण्यासाठी ठोस पावले उचलण्याचा निर्णय घेण्यात आला.

भटके-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली असून, येत्या ३१ ऑगस्ट रोजी होणाऱ्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन परिषदेतर्फे करण्यात आले आहे.बैठकीचे संचालन ओमप्रकाश गिरी तर आभार प्रदर्शन कुलकर्णी काका यांनी केले.

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी विश्वकर्मा ऑफसेट प्रिंटर्स, पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक– विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

“Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Vishwakarma Offset Printers, Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas Dolse,(Beed Justice)

# संचार

**जाहिर प्रगटन, कोर्टाची जाहिर नोटीस, जन्म-मृत्युची नोंद, निविदा सुचना, ई टेंडर, नावात बदल, वाढदिवस शुभेच्छा जाहिरात तसेच इतर जाहिराती व बातम्या प्रसिध्दीसाठी संपर्क करा**

**९४२३४७१८३३**

**७०२०६४२६९३**

संचार न्यूज ५

WhatsApp group

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

**दै. संचार च्या अंकाची पीडीएफ आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी ९४२३४७१८३३ या मोबाईल नंबरवर मेसेज करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा**